RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal

UGC-CARE LISTED



## RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

# Index


| अ.क्र. | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधीजींच्या धर्मविषयक विचारांची प्रस्तुतता | श्री. संतोष बुधाजी भावार्थे | १.५ |
| २ | प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्व | डॉ. किरण जयदेव सावे | ६.१११ |
| ३ | गांधीजी आणि श्रीमद्भगवद्गीता | डॉ. सचिन खोकले | १२.१४ |
| ४ | अहिंसातत्वज्ञानाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. विनोद संभाजी सोनवणे | १५.२१ |
| ५ | आज गरज महात्मा गांधीजीच्या अर्थकारणाची | डॉ. हनुमंत कुरकुटे | २२.२८ |
| ६ | महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. धनेश मधुकर हरड | २९.३४ |
| ७ | कृषी विकासात महात्मा गांधीजीच्या विचारांचे योगदान | प्रा. कांतीलाल शंकर पाटील | ३५.३९ |
| ८ | महात्मा गांधी यांच्या सर्वधर्मसमभाव विचारांची प्रासंगिकता | डॉ. माधव नरहरी कांबळे | ४०.४४ |
| ९ | महात्मा गांधी आदर्श ग्राम संकल्पना | प्रा.प्रकाश विष्णू घरत | ४५.४८ |
| १० | २१ व्या शतकात महात्मा गांधीजीच्या 'सत्याग्रह' तत्वज्ञानाचे महत्व | प्रा. प्रेरणा राऊत | ४९.५२ |
| ११ | गांधी आंबेडकर महासमन्वय : काळाची गरज | डॉ. राहुल हांडें | ५३.५६ |
| १२ | गांधीजींचे स्त्री विचार | प्रा. रामदास येडे | ५७.५९ |
| १३ | महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्वाचा प्रभाव | प्रा. रोहीत गायकवाड | ६०.६३ |
| १४ | महात्मा गांधीजीच्या विचारांचा शिक्षणमहर्षी कर्मवीर भाउराव पाटील यांच्या कार्यावर पडलेला प्रभाव: एक चिंतन | प्रा. सुनीलदत्त गोडसे | ६४.६६ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# महात्मा गांधी–आदर्श ग्राम संकल्पना

**प्रा. प्रकाश विष्णू घरत**
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर
विभाग : ग्रामीण विकास

## प्रस्तावना :

महात्मा गांधीजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान फार महत्वाचे आहे. १९२० ते १९४७ हा कालखंड 'गांधीयुग' म्हणून ओळखला जातो. मात्र गांधीजींचे कार्य फक्त स्वातंत्र्य चळवळी पूरते मर्यादित नाही. तर ते सर्वव्यापी आहे. त्यांनी एका बाजूला बलाढ्य अशा ब्रिटीश साम्राज्याविरूध्द लढा पुकारला तर एका बाजूला समाजातील अनिष्ट, रुढी, परंपरा, सामाजिक समस्या, अस्पृशता, बेरोजगारी, स्त्रीसमस्या, शिक्षण, ग्रामोद्योग या बाबत कार्य सूरु केले.

महात्मा गांधींनी स्वातंत्र्य चळवळी सोबत समाजातील विधायक कार्यक्रमावरही भर दिला होता. महात्मा गांधीजींच्या या विधायक कार्यक्रमांशी जनता अधिक निगडीत झाली. या मध्ये प्रामुख्याने त्यांनी घरोघरी चरख्याच्या प्रचारावर भर दिला त्यांनी दलितांच्या उध्दारासाठी अस्पृशता निवारण यावर विशेष भर दिला होता. त्यासाठी त्यांनी संपूर्ण भारत पिंजून व ग्रामीण भागात जाऊन लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण केली व स्वातंत्र्यलढा यशस्वी केला अशा या थोर, लढवय्या समाज सुधारकाने संपूर्ण जीवनच देशासाठी समर्पित केले.

## उद्देश :

महात्मा गांधीजींनी अंगिकारलेल्या साधनांद्वारे राष्ट्रहित, आदर्श ग्राम विकास व स्वातंत्र्य लढा योगदानाचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती :

सदर शोधनिबंधाकरीता व्दितीयक स्त्रोताच्या वापरातून विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करुन शोध निबंध पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

**महात्मा गांधी विचारधारा :**

महात्मागांधी यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याबरोबरच देशाचा विकास, समृध्द ग्रामरचना यासाठी एकाच वेळी कार्य सुरू केले. त्यांनी सर्व प्रथम संपूर्ण देश पिंजून काढला. त्यामुळे देशाचे खरे चित्र त्यांच्या समोर आले. त्यानंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळ आणि समृध्द ग्रामविकास या बाबत कार्ययोजना अवलंबवली. गांधीजी म्हणत असत की, भारत हा खेड्यांचा देश आहे. खरा भारत देश बघायचा असेल तर खेड्यात जावे लागेल. देशाचा जर विकास करावयाचा असेल. देशाला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हावयाचे असेल तर, प्रथम खेड्यांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनावे लागेल. त्या करीता त्यांनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली.

गांधीजींनी देशभर भ्रमण केल्यानंतर त्यांना याची जाणीव झाली की, ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात गरीबी, अज्ञान, आरोग्य विषयक अनास्था, निरक्षरता, सामाजिक असमानता, रोजगार समस्या, स्त्रियांच्या समस्या, अंध:श्रध्दा, शेतीच्या समस्या या सारख्या अनेक समस्यांनी ग्रामीण खेडी ग्रासलेली आहेत. या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रथम ग्रामीण भागात जाऊन त्या ठिकाणी वास्तव्य करुन लोकांचा विश्वास संपादन केला. त्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी आश्रम स्थापन केले. अशा आश्रमांची सुरुवात गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत राहात असताना केली होती. त्यांनी १९०४ मध्ये दक्षिण आफ्रिकेत 'फिनिक्स' हा आश्रम स्थापन केला. गांधीजींना हा आश्रम रस्कीनच्या 'Unto this last'या ग्रंथामुळे प्रभावित होवून, त्या विचारधारे प्रमाणे जीवन जगण्याच्या आकांक्षाने स्थापन केला व १९१० मध्ये 'टॉलस्टॉय' हा आश्रम सत्याग्रहीच्या परिवारासाठी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे स्थापन केला. तर भारतात आल्यानंतर २९ मे १९१५ मध्ये साबरमती येथे सत्याग्रही आश्रम स्थापन केला. त्यानंतर महाराष्ट्रात वर्धा येथे सेवाग्राम आश्रमाची स्थापना केली. त्यामधूनच पुढे महिलाश्रम आश्रमाची सुरुवात करुन विधवा महिलांसाठी खास कार्य सुरू केले. अशा आश्रमामधून अनेक विधायक उपक्रम सुरू केले. या कार्यासाठी त्यांनी सत्य व अहिंसा या मार्गाचा अवलंब केला. अहिंसेलाच त्यांनी शस्त्र बनविले.

समाजातील लोकांमध्ये असलेली अंध:श्रध्दा, भेदभाव, जातीवाद, कमी करुन समाजामध्ये एकात्मतेची भावना वाढीस लावली. लोकांनी एकत्र येऊन काम करावे म्हणून चरख्यावर सुत कताई व कापड विणणे व त्यातून स्वदेशीर चळवळ सुरु केली. असे अनेक उपक्रम सुरू करुन लोकांच्या हाताला काम दिले. गावाच्या गरजा गावातच पूर्ण होतील अशी व्यवस्था निर्माण केली व खेडे गावाला स्वयपूर्ण व स्वांवलंबी करण्याचा उप्रक्रम अवलंबविला.

म. गांधीजींच्या या उपक्रमात सर्व व्यक्ती समान होत्या. त्याच्या आदर्श ग्राम राज्यातील पहिला व शेवटचा व्यक्ती समान होता. आदर्श ग्राम राज्यात लोकतंत्र होते. प्रत्येक गावाचे शासन

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

चालविण्यासाठी गावातील लोकांना मान्य असलेल्या योग्यतेचे स्त्री–पुरूष हे पंच असतील व या पंचामार्फत गावाचा कारभार चालविला जाईल (पंचामुखी परमेश्वर) अशा ग्राम सत्तेत कायदेमंडळ, न्याय मंडळ, ग्राम प्रशासन अशी सर्व कामे या ग्रामपंचायती मार्फत केली जातील त्यांच्या या कार्यात इतर ग्राम हस्तक्षेप करणार नाहीत. हे कार्य अहिंसक मार्गाने व सर्व संम्मतीने पार पाडली जातील थोडक्यात 'रामराज्याच्या धरतीवर' गावाचा कारभार पाहिला जाईल अशी धारणा गांधीजींची होती.

गांधीजींनी देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला. यामध्ये प्रामुख्याने सत्याग्रह, कायदेभंग, जेलभरो आंदोलन स्वदेशी चळवळ व परकीय मालावर बहिष्कार, उपोषण या सारख्या मार्गाचा अवलंब केला. त्याच बरोबर सत्य, अहिंसा, विश्वास, असहकार आणि नि:शस्त्र प्रतिकार या शस्त्रांनी लढा यशस्वी करुन दाखविला आणि संपूर्ण जगाला अहिंसा हे शस्त्र किती महत्वाचे आहे. याची जाणीव करुन दिली.

गांधी जीवनाचा अभ्यास करत असताना त्यांचे जीवन हे देशासाठी समर्पित जीवन होते. हे त्यांच्या 'सत्याचे प्रयोग' यातून अनुभवायास मिळते. समाजातील अनेक समस्या, अज्ञान व गुलामगिरी या बद्दल त्यांना अतिव दु:ख होई. समाजाबद्दल असलेली तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. म्हणून शेवटी त्यांनी आपल्या बॅरीस्टर या व्यवसायाचा त्याग केला व स्वातंत्र्यलढा व समाज सुधारणा या दोन पातळीवर एकाच वेळी लढा सुरु केला. गांधीजींचा जास्त भार हा समाज सुधारण्यावर होता. समाज जागरूक झाला तर नक्कीच लोक अन्याया विरुध्द पेटून उठतील. म्हणून मानव हा विकासाचा केंद्र बिंदू आहे यावर त्यांचे श्रध्दा होती, विश्वास होता. म्हणून त्यांनी मानवालाच केंद्रबिंदू आणून समाज विकासाला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी आदर्शग्राम रचना, स्वयंपूर्ण व स्वंयशासन ग्राम यावर जास्त भर दिला. त्यांच्या आदर्श ग्राम संकल्पनेत खालील गोष्टी अंतर्भूत होत्या.

१) आदर्श खेडयाची स्थिती ही प्राचीन ग्रीक नगर राज्यासारखी असावी. यामध्ये गावाच्या सर्व गरजा गावातच पूर्ण केल्या जाव्यात. एका गावाला दुसऱ्या गावावर अवलंबून राहता कामा नये.

२) शेतीकृषी हा अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतीवर आधारीत अनेक कुटीरोद्योग, पुरक उद्योग, सुरू केले पाहिजेत की, ज्यामुळे प्रत्येक हाताला काम मिळेल.

३) सर्व प्रकारच्या सत्तेच्या केंद्रीकरणाला गांधीजींचा सक्त विरोध होता. त्यांच्यामते सत्तेच्या केंद्रीकरणामुळे व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व पणास लागते. म्हणून त्यांनी सुरूवातीपासूनच सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा आग्रह धरला होता.

४) गांधीजींच्या मते भारतात भांडवलाची कमतरता आहे. म्हणून कमी भांडवल लागणारे लहान–लहान उद्योग सुरू करावेत. त्यामुळे परकीय भांडवलाचा ओघ कमी होवून इथल्या

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

कच्च्या मालाचा वापर देशातच होऊन स्वदेशीचा पुरस्कार करता येईल. त्यासाठी त्यांनी चरखा, सुतकताई, खादीचा वापर यावर विशेष जोर दिला.

५) गांधीजींनी विश्वस्ताची कल्पना मांडली होती. कारण संपत्तीच्या केंद्रिकरणामुळे भांडवलदार व कामगार वर्ग अशी विभागणी होते. यामध्ये कामगार वर्गावर अन्याय होईल यासाठी गांधीजींनी असे मत व्यक्त केले की, भांडवलदारांनी आपली संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी वापरावी व या संपत्तीचे आपण मालक नसून फक्त विश्वस्त आहोत असे विचार त्यांनी मांडले होते.

६) स्त्री व पुरूष हे समाजाचे दोन मुख्य घटक आहेत. मात्र स्त्रियांची स्थिती फार दयनीय होती. यामध्ये विशेषत: विधवा स्त्रियांच्या बाबत त्यांचे विचार मोलाचे आहेत. तसेच पडदा पध्दत या बद्दलही त्यांनी विचार मांडले आहेत.

७) भारतीय समाजाला लागलेला मोठा कलंक म्हणजे अस्पृशता होय. यामुळे माणसा–माणसात भेदभाव केला जातो. म्हणून अस्पृशता नष्ट करण्यासाठी गांधीजींनी कार्य केले आहे.

८) समाजात असणाऱ्या मद्यपानाला गांधीजींचा विरोध होता. मद्यपानामुळे शरीर संपत्ती तसेच आर्थिक हानी होते. म्हणून त्यांनी दारुबंदीसाठी आंदोलन केले.

या सारख्या अनेक पातळयावर गांधीजींनी समाज सुधारणेचा लढा सुरू केला समाज जागृती केली आदर्श ग्राम रचना केली व स्वातंत्र्य चळवळ यशस्वी करुन दाखविली.

## सारांश :

थोडक्यात महात्मा गांधीजींची आदर्श खेडे गावाची संकल्पना ही समाज सुधारण्यासाठी व देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यास उपयुक्त ठरली. त्यांच्या मते कोणत्याही विकासाचा माणूस हा केंद्रबिंदू असला पाहिजे. आपल्या देशाचा विचार करता बहुसंख्य जनता ही खेडे गावात वास्तव्य करते म्हणून त्यांनी 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली व त्यालाच केंद्रबिंदु मानून समाज विकास व देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

## संदर्भ :

१. सत्याचे प्रयोग, महात्मा गांधी, साकेत प्रकाशन.
२. महात्मागांधींच्या विचारांचा समाजावरील भाव, प्राचार्य डॉ.संभाजी देसाई, प्रशांत पब्लिकेशन्स.
३. गोष्टीरूप गांधीजी व इतर, साने गुरूजी, रिया पब्लिकेशन्स.
४. महात्मा गांधी विचार सृष्टी, यशवंत सुमंत, साधना प्रकाशन.
५. गांधी युग, डॉ. धनंजय आचार्य, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.